# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

## Savitribai Phule Pune University

**(formerly University of Pune)**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ४०(२)(क)[40(2)(a)], ४०(२)(घ)(दोन)[40(2)(d)(ii)] आणि ४०(२)(घ)(तीन)(क),(ख),(ग),(घ)[40(2)(d)(iii)(A)(B)(C)(D)] नुसार आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेमध्ये समाविष्ट असलेल्या अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून स्वीकृतीबाबत..**

## <u>जाहीर प्रकटन</u>

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम १२(८) नुसार मा. कुलगुरु यांनी त्यांच्या अधिकारात पारित केलेला आदेश क्रमांक २१२/२०१७, संदर्भ क्रमांक सीबीएस/६५६, दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ अन्वये विहित करण्यात आलेल्या प्रत्येक विषयासाठी किंवा विषयांच्या गटासाठी तयार करण्यात आलेल्या अभ्यास मंडळांवर, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, दिनांक २८ एप्रिल, २०१७ मधील अनुसूची-दोन अन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्याच्या अथवा स्वीकृत करुन घेण्यासाठी विनिर्दिष्ट केलेल्या पात्रता शर्ती नुसार, प्रत्येक विषयासाठी किंवा विषयांच्या गटासाठी प्रत्येक अभ्यास मंडळासाठी एकूण पाच सदस्यांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ४०(२)(घ)(दोन)[40(2)(d)(ii)] आणि ४०(२)(घ)(तीन)(क),(ख),(ग),(घ)[40(2)(d)(iii)(A)(B)(C)(D)] नुसार स्वीकृत करावयाचे आहे. तसेच ज्या विषयासंबंधात विद्यापीठ विभाग नसेल त्याबाबतीत, त्या विषयातील पदव्युत्तर स्तरावर अध्यापन करणाऱ्या संलग्न महाविद्यालयांमधील किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेमधील पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी ज्यांना मान्यता मिळालेली आहे, अशा विभागाच्या प्रमुखासही स्वीकृत करावयाचे आहे.

१) कलम ४०(२)(क) ज्या विषयासंबंधात विद्यापीठ विभाग नसेल त्याबाबतीत त्या विषयातील पदव्युत्तर स्तरावर अध्यापन करणाऱ्या संलग्न महाविद्यालयांमधील किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेमधील पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी मान्यता ज्यांना मिळालेली आहे, असा विभागप्रमुख;

२) कलम ४०(२)(घ)(दोन) इतर विद्यापीठातील एक प्राध्यापक;

३) कलम ४०(२)(घ)(तीन)(क) राष्ट्रीय प्रयोगशाळा किंवा परिसंस्थांतील किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा उद्योग यांमधील सहायक संचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसलेले पद धारण करणारी व्यक्ती किंवा मान्यताप्राप्त राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये त्या विषयातील किमान एक संदर्भ पुस्तक किंवा तीन संशोधन प्रबंध प्रसिद्ध झाले आहेत अशा संबंधित क्षेत्रामधील तज्ज्ञ व्यक्ती;

४) कलम ४०(२)(घ)(तीन)(ख) संबंधित विषयातील नामवंत विद्याव्यासंगी व्यक्ती;

५) कलम ४०(२)(घ)(तीन)(ग) विषयाशी संबंधित उद्योगामधील किंवा व्यावसायिक संस्थांमधील नामवंत व्यक्ती;

६) कलम ४०(२)(घ)(तीन)(घ) विषयाशी संबंधित उद्योगामध्ये किमान दहा वर्षे कामाचा अनुभव किंवा विषयाशी संबंधित उद्योगाचा मालक किंवा सल्लागार किंवा संयंत्रणा याचा अनुभव असणारी व्यक्ती.

महाराष्ट्र शासन राजपत्र दि. २८ एप्रिल, २०१७ अन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडून येण्याच्या, नामनिर्देशित करण्याच्या अथवा स्वीकृत करुन घेण्याच्या पात्रता व शर्ती विहित केल्या असून त्यातील अनुसूचि दोन मध्ये स्वीकृत करुन घेण्याच्या विहित केलेल्या पात्रता व शर्तीस अनुसरुन अभ्यास मंडळांच्या पहिल्या बैठकीत वरील तरतुदींनुसार खाली नमुद सदस्यांची स्वीकृती करण्यात आली.

**आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेमध्ये समाविष्ट असलेल्या** प्रत्येक विषयासाठी किंवा विषयांच्या गटासाठी असलेल्या अभ्यास मंडळाने त्यांच्या पहिल्या बैठकीत खालीलप्रमाणे सदस्यांची स्वीकृती केली आहे :

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>अभ्यास मंडळाचे नाव</th><th>म.सा.वि.अ.,२०१६ मधील कलम</th><th>स्विकृत सदस्याचे नाव व पत्ता</th></tr>
<tr><td rowspan="5">१.</td><td rowspan="5">एज्युकेशन</td><td>४०(२)(घ)(दोन)</td><td>डॉ. मिश्रा प्रदिपकुमार, संचालक<br>नीपा, नवी दिल्ली</td></tr>
<tr><td>४०(२)(घ)(तीन)(क)</td><td>डॉ. काटमोरे रमाकांत महादेव, सहसंचालक<br>एससीईआरटी, सदाशिव पेठ, पुणे</td></tr>
<tr><td>४०(२)(घ)(तीन)(ख)</td><td>डॉ. सुधाकर वेणूकापल्ली, अधिष्ठाता<br>सी.आय.ई.एफ.एल. केंद्रिय विद्यापीठ, हैदराबाद</td></tr>
<tr><td>४०(२)(घ)(तीन)(ग)</td><td>डॉ. कुकरेती बी. आर., विभागप्रमुख<br>एम. जे. पी. रोहीलखंड विद्यापीठ, उत्तर प्रदेश</td></tr>
<tr><td>४०(२)(घ)(तीन)(घ)</td><td>डॉ. पळशीकर माधव वसंत,<br>संचालक, कॉम्प्युटर सायन्स विद्याशाखा,<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक</td></tr>
<tr><td rowspan="5">२.</td><td rowspan="5">ॲडमिनिस्ट्रेशन ॲण्ड इव्हॅल्युएशन</td><td>४०(२)(घ)(दोन)</td><td>--</td></tr>
<tr><td>४०(२)(घ)(तीन)(क)</td><td>डॉ. बच्छाव प्रकाश, सहसंचालक<br>उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१</td></tr>
<tr><td>४०(२)(घ)(तीन)(ख)</td><td>--</td></tr>
<tr><td>४०(२)(घ)(तीन)(ग)</td><td>डॉ. भांडारकर के.एम., अध्यक्ष<br>सी.टी.ई.एफ., २०३ मर्श अपार्टमेंट, प्रसाद हॉस्पीटल जवळ, नागपूर ४४००१०</td></tr>
<tr><td>४०(२)(घ)(तीन)(घ)</td><td>श्री. वझे केशव,<br>सदस्य, व्यवस्थापन परिषद<br>शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे ४११०३०</td></tr>
<tr><td rowspan="5">३.</td><td rowspan="5">एज्युकेशन सायकॉलॉजी</td><td>४०(२)(घ)(दोन)</td><td>--</td></tr>
<tr><td>४०(२)(घ)(तीन)(क)</td><td>--</td></tr>
<tr><td>४०(२)(घ)(तीन)(ख)</td><td>डॉ. शेफाली पंडया,<br>प्रारंभ, स्मार्ट सीटी, देधाल क्रॉस रोड, बावला, अहमदाबाद २०</td></tr>
<tr><td>४०(२)(घ)(तीन)(ग)</td><td>डॉ. सप्रे निलिमा,<br>“आपणच”, एन.जी.ओ., पुणे</td></tr>
<tr><td>४०(२)(घ)(तीन)(घ)</td><td>डॉ. ताटपुजे दिपक,<br>यशश्री अपार्टमेंट, यादोगोपाल पेठ, सातारा ०२</td></tr>
</table>

अभ्यास मंडळावर स्वीकृत झालेल्या सर्व सदस्यांचे विद्यापीठातर्फे हार्दिक अभिनंदन.

उपरोक्त नमूद सदस्यांची स्वीकृती ही, महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२८ एप्रिल, २०१७ व त्यासंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके / पत्रे यांच्या अन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकार मंडळावर स्वीकृत होण्यासाठी शासनाने विहीत केलेल्या पात्रता, शर्ती यांच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ४०(२)(क)[40(2)(a)], ४०(२)(घ)(दोन) [40(2)(d)(ii)] आणि ४०(२)(घ)(तीन)(क),(ख),(ग),(घ) [40(2)(d)(iii)(A)(B)(C)(D)] नुसार सर्व संबंधित व्यक्तीच्या स्वीकृत सदस्यत्वाची मुदत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ६२ मधील तरतुदीनुसार दिनांक ३१ ऑगस्ट, २०२७ पर्यंत राहिल व कलम ६३ आणि ६४ मधील तरतूद अथवा महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणा-या आदेशास अधिन राहून यापैकी जे अगोदर घडेल त्या तारखेस संपुष्टात येईल, सर्व संबंधितांनी याची कृपया नोंद घ्यावी.

संदर्भ क्र. : साफुपुविनि/२८४ — (डॉ. प्रफुल्ल पवार)
दिनांक : ०६/०७/२०२३ — कुलसचिव

**प्रत : सर्व संबंधित सदस्य.**

**प्रत माहितीसाठी :**

१. मा. कुलगुरु कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.
३. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
४. वित्त व लेखा अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ.
५. मा. विभागप्रमुख, संबंधित विभाग.
६. मा. प्राचार्य, संबंधित महाविद्यालय.
७. उपकुलसचिव, शैक्षणिक विभाग (अभ्यास मंडळे कक्ष), प्रस्तुत विद्यापीठ.
८. उपकुलसचिव, सभा व दप्तर विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
९. उपकुलसचिव, सर्वसाधारण विभाग व जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.